**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर, शेतक-यांच्या शेताच्या बांधावर व पडीक शेत जमिनीवर कृषि विभागामार्फत वृक्ष/फळझाड लागवड कार्यक्रम सन २०१४ - १५ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अमंलबजावणी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ नुसार राज्यात सुरू आहे. या कायद्याच्या परिशिष्ट-१ च्या कलम १(४) नुसार शासन निर्णय क्र. मग्रारो २०११/ प्र.क्र.१३२/ रोहयो- १०अे दि. २० जानेवारी २०१२ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर कृषि विभागामार्फत फळझाड लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत तसेच शासन निर्णय क्र.मग्रारो २०११/प्र.क्र.१२०/रोहयो-१० अे, दिनांक १४ मार्च २०१२ अन्वये वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेताच्या बांधावर व शेतक-यांच्या पडीक शेत जमिनीवर वृक्ष/फळझाड लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत मंजूरी दिलेली आहे. शासन पीरपत्रक क्र. मग्रारो २०११/प्र.क्र.१३२/रोहयो - १० अे दिनांक २३/५/२०१२ नुसार सदर कार्यक्रम सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या दोन वर्षामध्ये राबविण्यासाठी रोपवाटीका, पुर्व पावसाळी कामे व लागवड कामाच्या सनियंत्रण कार्यपद्धतीबाबत विस्तृत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदरचे शासन निर्णय www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. वरील सर्व शासन निर्णयांमध्ये योजना राबविण्यासंबंधी सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयांतील मार्गदर्शक सूचनांव्यतिरीक्त खालील सूचनांचा अवलंब करून योजना यशस्वीपणे राबविणे आवश्यक आहे.

शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ साठी जिल्हानिहाय २.८६ कोटी वृक्ष लागवड याप्रमाणे लक्ष्यांक देण्यात आलेला आहे. देण्यात आलेले उद्दिष्ट शासनाने ठरवून दिलेल्या कार्यप्रणाली प्रमाणे पूर्ण होण्याच्या दृष्टिने सदर योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे ऑनलाईनद्वारे संनियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र वेब साईट (https://mahapms.mahaonline.gov.in) तयार करण्यात आलेली आहे. सदर वेब साईटवर संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी तालुका स्तरावरुन रोपवाटीका, उपलब्ध रोपे, खोदण्यात आलेले खड्डे व झालेली लागवड याबाबतची गावनिहाय माहिती दररोज अद्ययावत करावयाची आहे. यासाठी प्रत्येक तालुका कृषि अधिकारी यांना लॉग-इन आयडी व पासवर्ड देण्यात आलेला आहे. याद्वारे तालुकानिहाय झालेल्या कामाचे जिल्हा- विभाग - आयुक्तालय - शासन स्तरावर ऑन लाईन कार्यप्रणालीद्वारे सनियंत्रण केले जाणार आहे.

**राज्यात सन २०१४-१५ मध्ये १०० कोटी वृक्ष लागवड योजनेमध्ये खालील योजनाचा समावेश आहे.**

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर फळबाग लागवड.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेताच्या बांधावर

३) शेतकऱ्यांच्या पडीक शेत जमिनीवर फळझाड लागवड.

सदर योजनेमध्ये खालीलप्रमाणे योजनानिहाय फळपिकाचा समावेश केला आहे.

**अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर कृषि विभागामार्फत फळबाग लागवड : -**

१) आंबा कलमे २) आंबा रोपे (इनसीटू पध्दतीने) ३) काजू कलमे ४) चिकू कलमे ५) पेरू कलमे ६) डाळिंब कलमे ७) संत्रा कलमे ८) मोसंबी कलमे ९) लिंबू कलमे १०) नारळ रोपे(बाणवली/टि.डी.) ११) बोर रोपे १२) सिताफळ रोपे १३) सिताफळ कलमे १४) आवळा रोपे १५) आवळा कलमे १६) चिंच रोपे १७) कवठ रोपे १८) जांभूळ रोपे १९) कोकम रोपे २०) कोकम कलमे २१) फणस रोपे २२) फणस कलमे २३) अंजीर कलम २४) सुपारी.

**ब) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर वृक्ष लागवड :-**

१) आंबा रोपे २) आंबा कलमे ३) काजू कलमे ४) बोर रोपे ५) सिताफळ रोपे ६) सिताफळ कलमे ७) आवळा रोपे ८) आवळा कलमे ९) चिंच/कवठ/जांभूळ रोपे १०) कोकम रोपे ११) कोकम कलमे १२) फणस रोप १३) फणस कलमे १४) बांबू रोपे १५) करंज रोपे १६) पेरू कलमे १७) लिंबू रोपे १८) नारळ कलमे १९) साग रोपे २०) गिरीपुष्प रोपे २१) सोनचाफा रोपे २२) कडीपत्ता रोपे २३) कडूलिंब रोपे २४) सिंधी रोपे २५) शेवगा रोपे २६) हादगा रोपे

**<u>क) शेतक-यांच्या पडीक शेत जमिनीवर वृक्ष लागवड :-</u>**

१) आंबा रोपे २) आंबा कलमे ३) काजू कलमे ४) बोर रोपे ५) सिताफळ रोपे ६) सिताफळ कलमे ७) आवळा रोपे ८) आवळा कलमे ९) चिंच/कवठ/जांभूळ रोपे १०) कोकम रोपे ११) कोकम कलमे १२) फणस रोपे १३) फणस कलमे १४) बांबू रोपे १५) जट्रोफा रोपे १६) करंज व इतर औषधी वनस्पती १७) साग रोपे १८) गिरीपुष्प रोपे १९) सोनचाफा रोपे २०) कडीपत्ता रोपे २१) कडूलिंब रोपे २२) सिंधी रोपे २३) शेवगा रोपे २४) हादगा रोपे

**(* औषधी वनस्पती - अर्जुन, असान, अशोका, बेहडा, बेल, हिरडा, टेटू, डिकेमाली, रक्तचंदन, रिठा, लोध्रा, आइरन, शिवण, गुग्गुळ, वावडिंग, बिब्बा रोपे इ.)**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधियिमाच्या परिशिष्ट १ कलम १ (४) मधील तरतुदीनुसार फळबाग लागवड खालील प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर हाती घेण्यास मान्यता दिली आहे.

- अ) आसुचित जाती
- ब) आसुचित जमाती
- क) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी

ड) भु-सुधार योजोचे लाभार्थी

इ) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी हमी

फ) कृषि कर्ज माफी योजाना २००८ नुसार अल्प भूधारक व सिमांत शेतकरी

ग) अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ नुसार पात्र व्यक्ती.

**मार्गदर्शक सुचना :**

**१. लाभार्थी निवड :** मग्रारोहयोसाठी जॉबकार्ड धारक वरील अ ते ग प्रवर्गातील कोणतीही व्यक्ती वैयकतीक लाभार्थी म्हणू या योजोचा लाभ घेण्यास पात्र राहील. फळझाड /वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत आवश्यक ती सर्व कामे लाभधारकाने स्वत: व जॉबकार्ड धारक मजूराकडू करूण घेणे आवश्यक आहे. त्यासाठी नियोजन करावे.

**२. ग्रामसभा मंजूरी :** मग्रारोहयोच्या कार्यपध्दतीप्रमाणे ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या सहकार्यांने या योजोअंतर्गत कोणाला व किती लाभ घेता येईल याबाबत ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थ्यांची निवड करावी. लाभार्थी निवडीची कार्यवाही माहे एप्रिल २०१४ अखेर पूर्ण करण्यासाठी ग्रामसभा आयोजित करावी. मग्रारोहयोच्या कार्यपध्दतीनुसार वरील अ ते ग प्रवर्गातील लाभार्थ्यांना २ हेक्टर क्षेत्राचे मर्यादेत वृक्ष फळझाड लागवड करता येईल.

**३. तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी :** मग्रारोहयो अंतर्गत तांत्रिक मंजूरीचे अधिकार तालुका कृषि अधिकारी व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार तहसिलदार यांना प्रदान केले आहेत. लाभार्थीना किती क्षेत्रावर, कोणत्या फळझाडाची तसेच कोणत्या प्रकारात (वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग फळझाड लागवड, शेतक-यांच्या बांधावर व पडीक शेत जमिनीवर लागवड याप्रमाणे) लागवड करावयाची आहे त्याप्रमाणे शासानाने मंजूर केलेल्या मापदंडानुसार स्वतंत्रपणे अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक आहे. सविस्तर अंदाजपत्रके तयार करताना शासनाने वरील तिन्ही योजानामधील फळपिकांचे मापदंड मंजूर केले आहेत त्याआधारे सविस्तर अंदाजपत्रके तयार करावीत. उदा. सलग व पडीक जमिनीवर फळझाड/वृक्ष लागवडीमध्ये एकाच प्रकारच्या फळझाड/वृक्षांची लागवड अपेक्षित आहे. बांधावर लागवड कार्यक्रम घेताना बांधाच्या लांबीनुसार व फळझाड / वृक्ष प्रजातीसाठी शिफारस केलेल्या दोन झाडामधील अंतरानुसार लागवड करणे शक्य आहे. तेवढया रोपांची लागवड करण्यास मान्यता राहील. परिशीष्ठानुसार दिलेल्या खर्चाच्या मापदंडानुसार प्रत्यक्षात लागवड करावयाच्या झाडांची संख्या विचारात घेवुन खर्चाचे अंदाजपत्रक तयार करावे व त्यास तांत्रीक मंजूरी घेण्यात यावी.

१० शेतक-यांसाठी एक प्रकल्प याप्रमाणे लाभार्थ्याच्या शेताच्या बांधावरील व पडिक शेत जमिोीवरील वृक्ष लागवड हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात येईल अशा १० प्रकल्पासाठी तहसिलदार व तालुका कृषि अधिकारी यांच्याकडू प्रशासकीय व तांत्रिक मायता घेण्यात यावी. तसेच या १० प्रकल्पाला MIS वर नोंद घेण्यासाठी स्वतंत्र संगणक क्रमांक असेल.

४. **प्रशिक्षण** : मग्रारोहयो अंतर्गत निवड केलेल्या लाभार्थीना वेळोवेळी वृक्ष / फळझाड लागवड साठी त्यांनी करावयाची कामे, अनुदान व लागवडीनंतर फळबागेचे संवर्धन याशिवाय इतर तांत्रिक बाबी म्हणजे खड्डे खोदणे,

शास्त्रोक्त पध्दतीने खड्डे भरणे, कलमीकरण, पिकसंरक्षण, खते देणे, पाणी देणे, काढणी पश्चात तंत्रज्ञान, व मार्केटींग याबाबत प्रशिक्षण आयोजित करून माहिती देण्यात यावी. यासाठी लागणारा खर्च इतर संकीर्ण या बाबीवरील अनुदानातून भागवावा. प्रत्येक प्रशिक्षण वर्गात किमान ५० शेतकरी असावेत. त्यासाठी जवळजवळच्या गावातील शेतक-यांना एका ठिकाणी /गावी प्रशिक्षण देण्यात यावे.

५. **प्रसिध्दी :** तालुका कृषि अधिकारी यांचे स्तरांवरून स्थानिक मराठी वर्तमानपत्रात या योजनेची माहिती प्रसिध्द करणे, योजना राबविण्यासंबंधी माहिती पत्रके छापणे, पोस्टर्स लावणे याद्वारे प्रसिद्धी करण्यात यावी. यासाठी लागणारा खर्च इतर संकीर्ण या बाबीवरील अनुदानातून भागवावा.

६. **वृक्ष /फळबाग लागवडीसाठी खड्डे खोदणे / भरणे** : मग्रारोहयो अंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांच्या शेतात/बांधावर व पडीक शेत जमिनीमध्ये लागवड करावयाच्या वृक्ष/फळझाडाचे खड्डे खोदण्यासाठी शासन निर्णयासोबत फळपिकाहिाय खड्डयाचा आकार दिला आहे. त्यानुसार खड्डे खोदून त्यात शेणखत, रासायाकि खत व किटकानाशक यांचे मिश्रणाने भरावे. लागवड करावयाच्या वृक्ष / फळझाडासाठी खड्डे खोदणे व खड्डे भरण्याची कार्यवाही माहे एप्रिल ते मे या महियात पूर्ण करावी. मे महिन्यानंतर वृक्ष/फळझाड लागवडीसाठी खड्डे घेण्यात येऊ नयेत.

७. **वृक्ष / फळझाड लागवड :** शासन निर्णय दि. १४ मार्च २०१२ मध्ये लागवड करावयाच्या वृक्ष /फळझाडाची कलमे/रोपे उपलब्धतेनुसार खालील प्रमाणे प्राथम्य क्रमाने करावी .

**१) कृषि विभागाच्या रोपवाटिका,**

**२) कृषि विद्यापिठांच्या रोपवाटिका**

**३) खाजगी शासा मायताप्राप्त रोपवाटिका**

**४) मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायतीच्या रोपवाटिका**

**५) सामाजिक वाकिरण विभाग किंवा अय शासकिय विभाग रोपवाटिका**

८. **लागवडीचा कालावधी :** वृक्ष फळझाड लागवडीचा कालावधी **१ जून २०१४ ते ३० नोव्हेंबर २०१४ पर्यत राहील.**

९. **संरक्षण :** या बाबीसाठी लागवड करावयाच्या वृक्ष फळझाडाचे तिही वर्षाचे खर्चाचे प्रमाणकेमध्ये मजूरी व सामुग्री या घटकावर खर्च दर्शविला आहे. त्यानुसार खर्च करावा.

१०. **पाणी देणे :** या बाबीसाठी लागवड करावयाच्या वृक्ष फळझाडाचे तिही वर्षाचे खर्चाचे प्रमाणकेमध्ये मजूरी व सामुग्री या घटकावर खर्च दर्शविला आहे. त्यानुसार खर्च करावा.

११. **निंदणी :** या बाबीसाठी लागवड करावयाच्या वृक्ष फळझाडाचे तिही वर्षाचे खर्चाचे प्रमाणकेमध्ये मजूरी व सामुग्री या घटकावर खर्च दर्शविला आहे. त्यानुसार खर्च करावा.

**१२. खते देणे :** या बाबीसाठी लागवड करावयाच्या वृक्ष फळझाडाचे तिही वर्षाचे खर्चाचे प्रमाणकेमध्ये मजूरी व सामुग्री या घटकावर खर्च दर्शविला आहे. त्यानुसार खर्च करावा.

**१३. इतर संकीर्ण :** या बाबीखालील अनुदानामधून कार्यालयीन खर्च, कलमे/रोपे वाहतूक, प्रशिक्षण, प्रसिद्धी व इतर आकस्मिक बाबीवर होणारा खर्च भागवावा.

**१४. कामाची नोंदणी व तपासणी :** मग्रारोहयो अंतर्गत वृक्ष / फळझाड लागवडीची नोंदणी मापन पुस्तिकेत वेळोवेळी करावी. तसेच ग्राम रोजगार नोंद वहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांचे उपविभागात लागणा-या मापा पुस्तिकेचा विचार करून शासकीय मुद्राालयातून छापून घेण्याची कार्यवाही करावी.

या व्यतिरीक्त MIS वरील सर्व प्रकारच्या नोंदी घ्याव्यात. मग्रारोहयो व रोहयोशी निगडीत वृक्ष / फळझाड लागवडीची तपासणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी करण्या-या कर्मचारी/अधिका-यांचे पदनाम | तपासणीची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | कृषि सहाय्यक | १०० |
| २. | कृषि पर्यवेक्षक | ५० |
| ३. | मंडळ कृषि अधिकारी | २५ |
| ४. | तालुका कृषि अधिकारी | १० |
| ५. | उपविभागीय कृषि अधिकारी | ५ |
| ६. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | २ |
| ७. | विभागीय कृषि सहसंचालक | १ |

**१५. देयके तयार करणे :** मग्रारोहयो अंतर्गत प्रत्यक्ष केलेल्या फळझाड लागवडीनुसार मजूरीचे हजेरी पत्रकाच्या आधारावर मजूरीचे देयक तयार करून तहसिलदार यांना सादर करावे. व त्यानुसार दर १५ दिवसानी मजुरांना मजूरी दिली जाईल याकडे लक्ष द्यावे. वृक्ष लागवडीसाठी लागणारी रोपे/कलमे याचा खर्च संबंधीत रोपवाटिकाकडील बीले/व्हाऊचर घेवून तालुका कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करून तहसिलदार यांना सादर करावी. तहसिलदार संबंधीत रोपवाटिका धारकांना रक्कम प्रदान करतील. तसेच निविष्ठा (खते, औषधे व इतर साहित्य) यावरील खर्चाची रक्कम थेट लाभार्थ्यांनी प्रमाणपत्र/व्हाऊचर सादर केल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांचे कडून देण्यात यावी.

**१६. हजेरी घेण्यासाठी हजेरी सहाय्यकाची नेमणूक करणे :** मग्रारोहयो अंतर्गत मजुरांची हजेरी घेण्यासाठी ग्राम रोजगार सेवकांची नियुक्ती करण्यास मुभा आहे. शासा पत्र क्र. मग्रारो २०१०/प्र.क्र.७/रोहयो १० अे दि. २९/८/२०११ अवये मग्रारोहयो अंतर्गत झालेल्या कामाच्या ६ टक्के प्रशासकीय निधी प्रत्येक जिल्हयाला उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधीमधून मा. तहसिलदार यांचेकडून तालुक्याला आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यांची नेमणूक करण्यात यावी.

**१७. लाभार्थ्यांची जबाबदारी** :

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट-१ (४) च्या अधिन राहून फळबाग लागवड करणारे लाभार्थी हे बहुतांशी जॉबकार्ड धारक असल्याने त्यांनी स्वत:चे क्षेत्रात केलेल्या फळबाग लागवडीचे संवर्धन/ जोपासना करण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

२ वृक्षनिहाय मंजूर मापदंडानुसार दुस-या व तिस-या वर्षातील जिवंत झाडांच्या टक्केवारीप्रमाणे कामे करण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

३. दुस-या व तिस-या वर्षी वृक्ष फळपिकांच्या बाबतीत ७५ टक्के झाडे जिवंत ठेवतील फक्त अशाच लाभार्थ्यांना दुस-या व तिस-या वर्षाचे अनुदान देय राहील.

**१८. मग्रारोहयो अंतर्गत फळझाड/वृक्ष लागवडीची आकडेवारी :** मग्रारोहयो अंतर्गत फळझाड/वृक्ष लागवडीची स्वतंत्र आकडेवारी तालुका कृषि अधिकारी यांनी सोबतचे विवरणपत्रात नमूद करूा ठेवावी. त्याची प्रत तहसिलदार यांना वेळेत सादर करावी. जेणेकरू तालुक्यात फळझाड/वृक्ष लागवडीबाबत साध्य झालेल्या उद्दिष्टाची माहिती मिळेल.

**सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या सूचनांचे पालन करुन मग्रारोहयो अंतर्गत सर्व कामे ठरवून दिलेल्या वेळेत पूर्ण करण्याकरीता, तसेच झालेल्या कामाची माहिती दररोज वेब साईटवर अपडेट होण्याच्यादृष्टिने आपण व्यक्तिश: लक्ष घालून सन २०१४-१५ साठी असलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात यावे. तसेच महिहिाय झालेल्या फळझाड /वृक्ष लागवडीचा मासिक प्रगती अहवाल सोबतच्या प्रपत्रात नमूद करूा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांचे मार्फत आयुक्तालयास दर महियाच्या १० तारखेपर्यत सादर करावे.**

वरीलप्रमाणे मग्रारोहयो योजोअंतर्गत फळझाड /वृक्ष लागवड कार्यक्रम क्षेत्रिय स्तरावरूा प्रभाविपणे/यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रस्तुत मार्गदर्शक सूचानानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत : विवरण पत्र व प्रपत्र १ ते ४**

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-५

## विवरणपत्र

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर, शेतक-यांच्या बांधावर व शेतक-यांच्या पडीक शेत जमिनीवर कृषि विभागामार्फत वृक्ष/फळझाड लागवडीची लाभार्थ्यीनिहाय माहिती**

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नाव | लाभार्थी प्रवर्ग | गाव | ग्रामपंचायत | सर्व्हे नं. | तालुका | खोदलेले खडडे संख्या | क्षेत्र हे. | लागवड केलेल्या वृक्ष फळझाडाचे | | | लागवडीची तारीख / कालावधी | पाण्याचे स्त्रोत | मजूर संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | नांव | वाण | क्षेत्र हे. | | | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** |
| | | | | | | | | | | | | | | |

## प्रपत्र -१

**सन २०१४-१५ मधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत व रोहयोशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत फळझाड/वृक्ष लागवडी संबंधी मासिक प्रगती अहवाल**

**माहे -**

| अ. क्र. | बाब | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या पडीक शेत जमिनीवर फळबाग लागवड | रोहयोशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत फळपिक लागवड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण गावे संख्या | | | | | |
| २ | निवड शेतकरी संख्या | | | | | |
| ३ | एकूण निवड केलेल्या शेतक-यांचे क्षेत्र हे. | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | संमती प्राप्त लाभार्थी संख्या | | | | | |
| ५ | तांत्रिक मंजरी क्षेत्र हे. | | | | | |
| ६ | तांत्रिक मंजूरी लाभार्थी संख्या | | | | | |
| ७ | प्रशासकीय मंजूरी क्षेत्र हे. | | | | | |
| ८ | प्रशासकीय मंजूरी लाभार्थी संख्या | | | | | |
| ९ | खडडे खोदलेले क्षेत्र हे. | | | | | |
| १० | खडडे खोदलेले संख्या | | | | | |
| ११ | खडडे खोदलेले लाभार्थी संख्या | | | | | |
| १२ | उपस्थित मजूर संख्या | | | | | |
| १३ | लागवड केलेले कलमे/रोपे क्षेत्र हे. | | | | | |
| १४ | फळपिक वृक्ष निहाय एकूण लागवड | | | | | |
| १५ | एकूण लागवड क्षेत्राचे लाभार्थी सख्या | | | | | |
| १६ | एकूण झालेला खर्च | | | | | |
| १७ | फळपिक/वृक्ष निहाय लागवडीचा तपशील | | | | | |

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ---------

# प्रपत्र -२

**सन २०१४-१५ मधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेतंर्गत व रोहयोशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत फळझाड/वृक्ष लागवडी संबंधीत मासिक प्रगती अहवाल**

**माहे -**

| अ. क्र. | बाब | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या ◌डीक शेत जमिनीवर फळबाग लागवड | रोहयोशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत फळपिक लागवड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | योजनेत समाविष्ट लाभार्थी | | | | | |
| २ | लाभार्थीचे क्षेत्र | | | | | |
| ३ | एकूण झालेली लागवड हे. | | | | | |
| ४ | वृक्ष/फळझाडाचे नाव व झालेली लागवड हे. | | | | | |

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -----**

# प्रपत्र -३

सन २०१२-१३ मधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत व रोहयोशी निगडीत फळझाड लागवड अंतर्गत फळझाड/ वृक्ष लागवडी संबंधीत अनुदान खर्चाचा मासिक खर्चाचा अहवाल.

माहे. :

| अ. क्र. | बाब | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या पडीक शेत जमिनीवर फळबाग लागवड | रोहयोशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत फळपिक लागवड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिन्यात झालेली लागवड हे. | | | | | |
| २ | पाहणी केलेले क्षेत्र हे. | | | | | |
| ३ | ७५ टक्के पेक्षा जास्त जिवंत झाडे असलेले क्षेत्र हे. | | | | | |
| ४ | देय अनुदान रू. | | | | | |
| ५ | तहसिलदार यांचेकडे केलेली मागणी रू. | | | | | |
| ६ | तहसिलदार यांचेकडून अदा केलेली रक्कम रू. | | | | | |
| ७ | मागणी केलेली रक्कम | | | | | |
| ८ | प्रत्यक्ष झालेला एकूण खर्च रू. | | | | | |

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -
-------

# प्रपत्र -४

**सन २०१२-१३ मधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत व रोहयोशी निगडीत फळझाड लागवड अंतर्गत फळझाड/ वृक्ष लागवडी संबंधीत अनुदान पात्र क्षेत्राचे वर्गीकरण मासिक प्रगती अहवाल.**

**माहे. :**

| अ. क्र. | बाब | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर फळबाग लागवड | मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या पडीक शेत जमिनीवर फळबाग लागवड | रोहयोशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत फळपिक लागवड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिन्यात लागवड केलेले क्षेत्र हे. | | | | | |
| २ | तपासणी केलेले क्षेत्र हे. | | | | | |
| ३ | अनुदान पात्र क्षेत्र हे. | | | | | |
| ४ | अनुदान पात्र क्षेत्राची टक्केवारी | | | | | |
| ५ | अनुदान पात्र क्षेत्राची टक्केवारी बाबत वृक्ष/ फळपिक निहाय माहिती नमूद करावी. | | | | | |

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -----**